दै. गोदातीर दि. 21-12-23

# 'स्थागुशा'चे पीआय उदय खंडेराय आणि डॉ. नितीन काशीकर यांचा एसपी कोकाटेंकडून सन्मान





**नांदेड–** जिल्ह्यात गंभीर व किचकट गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना अटक करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव पोलीस अधीक्षक यांच्याकडून करण्यात येत असतो. असाच गौरव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय आणि माहूरचे पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांनी विशिष्ट गुन्ह्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मासिक गुन्हे बैठकीत या दोन्ही अधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या अधिकाऱ्यांना शहरातील व जिल्ह्यातील गंभीर गुन्ह्याची उकल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यावरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सराफा व्यापाऱ्याची बॅग कळविणाऱ्या चोरट्यास पकडणे व शोध लावणे हे अतिशय कठीण व किचकट काम होते. परंतु त्यांचे सहकारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांच्या टीमने ओरिसामधून आरोपी अटक केला. या कारवाईत दोन पोलिसांना दुखापत सुद्धा झाली होती. चोरट्याकडून जवळपास साडेतीन लाख रुपये मुद्देमाल जप्त केला होता.

हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलिसांपुढे मोठे आव्हान होते. मात्र त्यांनी ते पोलीस अधीक्षक कोकाटे यांच्या आदेशावरून पूर्ण केले. यामुळे मासिक गुन्हे बैठकीदरम्यान उदय खंडेराय व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला.

यासोबतच माहूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गंभीर गुन्ह्याची उकल करून आरोपींना बेड्या ठोकल्या होत्या. त्या प्रकरणात माहूर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर व त्यांच्या टीमचे कौतुक करत काशीकर यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर बैठकीमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तपासीक अंमलदार, अधिकारी यांचा सन्मान पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे हे करत असतात.

या दोन्ही घटना गंभीर असल्याने त्या उघडकीस आणण्यासाठी पोलिसांनी केलेले परिश्रम व त्यासाठी वरिष्ठांनी त्यांच्या पाठीवर टाकलेली थाप ही नक्कीच कौतुकास्पद ठरली आहे.